# ‘लांडगा आला रे आला‘

**- अजित सावंत**

मुंबई हेरिटेज  कॉन्झर्व्हेशन कमिटीने सुमारे अडीच वर्षापूर्वी हेरिटेज स्थळांच्या यादीमधे समाविष्ट करण्यासाठी शिफारस केलेली १०८९ स्थळांची यादी अडगळीत पडून राहीली होती. एम्.एम्.आर्.डी.ए.च्या कृती समितीने शहरातील ७४२ व पश्चिम उपनगरातील २७२ व पूर्व उपनगरातील ७५ स्थळांची शिफारस करुन ही यादी राज्य शासनाच्या नगरविकास खात्याकडे मंजुरीसाठी पाठवली. नगरविकास खात्याने सप्टेंबर २००८ मधे, हया यादीच्या संदर्भामधे सूचना वा हरकती मागवून, ही यादी त्वरित मंजूर करावी अशी सूचना महापालिकेला केली होती. सप्टेंबर, २००९ मधे तत्कालीन महापालिका आयुक्त जयराज फाटक हयांनी ही यादी प्रमुख वर्तमानपत्रातून योग्य प्रसिध्दी देऊन त्यावर सूचना व हरकती मागविण्यासाठी विकास नियोजन खात्याकडे पाठवली.परंतु त्यानंतरही अगदी अलीकडेपर्यंत सुमारे ३ वर्षे ही यादी धूळ खात पडली होती. आता कुठे महापालिकेला जाग आली व नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी आयुक्तांनी ही यादी जाहीर केली. यादी जाहीर होताच, एकच कल्लोळ माजला. बिल्डर, मालमत्तांचे मालक, जमीन मालक आणि राजकारणी नेत्यांनी या यादी विरोधामधे गलका सुरु केला. विशेषत: शिवाजी पार्क व परिसरातील नागरिकांना या हेरिटेज स्थळांच्या यादी विरोधामधे संघटित करण्यास सुरुवात झाली. दादर-शिवाजी पार्क हा आपलाच बालेकिल्ला मानणाऱ्या शिवसेना व मनसे या दोन्ही संघटनांनी आपलीच पकड या मतदारसंघावर घट्ट करण्यासाठी शड्डू ठोकत रिंगणामधे उडी घेतली व हेरिटेज स्थळांची यादीमधील शिवाजी पार्क परिसराचा समावेश म्हणजे मराठी मध्यमवर्गियांविरुध्दचा कट असल्याची आवई उठवली. या मुळे मुंबईतील नागरिकांचे लक्ष या प्रकरणाकडे वेधले गेले आहे. अनेक प्रश्नही या निमित्ताने उभे राहीले आहेत. हेरिटेज यादीमधे विशिष्ट परिसरांचा व स्थळांचा समावेश कां करावा वा कां करु नये या चर्चेतूनच या प्रश्नांची उत्तरे मिळतील. त्या मुळे मुंबईतील ऐतिहासिक दृष्टया किंवा /व स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या व सांस्कृतिकदृष्टयाही महत्वाच्या असलेल्या स्थळांचे जतन होईल व हा

वारसा जपला जाईल व त्याचबरोबर विकासाच्या प्रक्रियेतील अडसरही दूर होतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. तथापि आक्रमकपणे नव्हे तर सूज्ञपणे दूरदर्शी धोरण आखण्याची मात्र आवश्यकता आहे.

विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम ६७ (३) नुसार विकासामधे, पुनर्विकासामधे दुरुस्तीमधे बदल करण्यामधे किंवा नूतनीकरणामधे येणार असलेल्या मर्यादांमुळे नागरिक शंकाग्रस्त झाले आहेत. बांधकाम व्यावसायिक हतबल झाले आहेत व राजकारणी नेते आक्रमक झाले आहेत. शिवाजी पार्क परिसराला, मुंबई शहरामधे एक वेगळीच ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी आहे. शिवाजी पार्क मैदानावरुनच अनेक दिग्गज नेत्यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले. लाखोंच्या उपस्थितीतल्या सभा, त्या सभांमधून, कॉ. डांगे, आचार्य अत्रे, जॉर्ज फर्नांडिस, एसेम जोशी यांच्यापासून ते थेट बाळासाहेब ठाकरे, शरद पवार व सोनिया गांधी यांची भाषणे, त्या सभा पाहिलेल्या नागरिकांच्या आज ही स्मरणांत आहेत. स्वातंत्र्य-आंदोलन ते संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, गिरणी कामगारांच्या लढयांपासून ते सीमा लढयांपर्यंत, आंदोलनांची नाळ शिवाजी पार्क मैदानाशी जुळलेली आहे हे कदापी विसरता येणार नाही. याच परिसरामधे आचार्य अत्रे, स्वातंत्र्यवीर सावरकर, थोर संगीत दिग्दर्शक वसंत देसाई, प्रबोधनकार ठाकरेंपासून, थोर संगीत दिग्दर्शक श्रीकांत ठाकरे पर्यंतच्या थोर व्यक्तींचे वास्तव्य होते. गदिमांच्या गीत रामायणाचे सूर या परिसरात गुंजले व ज्येष्ठ संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र यांची बोटेही संवादिकेवर येथेच फिरत असत. शाहू मोडक, बाबूराव पेंढारकर, गजानन जागिरदार, या चित्रपटसृष्टीतल्या दिग्गजांचे वास्तव्यही येथलेच ! या मान्यवरांच्या वास्तव्याने हा परिसर पावन झाला आहे. आजही या थोरांच्या वास्तव्याचे पवित्र स्पर्श लाभलेल्या वास्तूंसमोर आपोआपच नतमस्तक व्हावयास होते. इतिहासाचा, संस्कृतीचा हा वारसा आपण काळाच्या उदरामधे गडप होऊ देणार की त्याचे जतन करुन नव्या पिढयांसमोर ही प्रेरणास्थाने कायम उभी ठेवणार, हाच महत्वाचा प्रश्न आहे. शिवाजी पार्क परिसरामधल्या सुमारे ६५ इमारतींच्या पुनर्विकासाची संधी या

परिसराचा हेरिटेज यादीमधे समावेश झाल्याने हुकणार आहे. या मुळे मराठी मध्यमवर्गियांवर अन्याय होणार आहे असे काही नेत्यांचे म्हणणे आहे. या परिसरामधे गेल्या काही वर्षामधे सुमारे १६ इमारतींचा पुनर्विकास झाला. टोलेजंग टॉवर्स उभे राहिले. या टॉवर्समधे किती मराठी कुटुंबांनी नव्याने जागा घेतल्या ! जुन्या भाडेकरूंपैकी किती मराठी भाडेकरु पुनर्विकासित इमारतीमधे रहावयास गेले वा जागा विकासकास विकून शिवाजी पार्क परिसराबाहेर निघून गेले याचा मागोवा घेणेही योग्य ठरेल. मध्यंतरी शिवाजी पार्क परिसरामधे 'इस्लामिक टॉवर' उभा रहात असल्याचे वृत्त 'सामना' मधे प्रसिध्द झाले होते. त्याला विरोधही करण्यात आला होता. पुनर्विकासाचे घोडे पुढे दामटले की त्यावर कोण आरुढ होते याचा अंदाज बांधता येत नाही. परळ, लालबाग असो वा वडाळा-नायगांव, प्रभादेवी, माहीम या प्रामुख्याने मराठी लोक वस्तीचा भाग असलेल्या विभागांमधे जेथे जेथे पुनर्विकास झाला तेथे बहुसंख्य ठिकाणी 'मांसाहारास मज्जाव' करणाऱ्यांना सदनिका खरेदीस मज्जाव असल्याच्या पाटया लावून, अन्य प्रांतीयांच्याकरिताच असलेले टॉवर्स उभे राहिले व या विभागांतील मूळ मराठी माणूस दूर मुंबई बाहेर फेकला गेला. दुर्दैवाने मराठी माणसांचे कैवारी म्हणविणाऱ्यांनी देखिल या प्रक्रियेला कळत नकळत हातभार लावला, ही वस्तुस्थिती आहे.

शिवाजी पार्क परिसरातल्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास थांबेल याची चिंता, परिसरामधे रहाणाऱ्या भाडेकरु नागरिकांपेक्षा राजकीय नेत्यांनाच जास्त भेडसावते आहे असे दिसते. पुनर्विकास हवा असे म्हणणाऱ्या नागरिकांच्या संख्येइतकाच किंबहुना जास्त नागरिकांचा पुनर्विकासाला विरोध असल्याचेही जाणवते. आज या परिसरातील अनेक कुटुंबातील तरुण मुले परदेशी वा अन्यत्र नोकरी धंद्याच्या निमित्ताने असून, वयोवृध्द ज्येष्ठ नागरिक पती-पत्नी आयुष्याची सायंकाळ एकमेकांच्या आधाराने व्यतित करीत असल्याचे चित्र अनेक कुटुंबांमधे दिसते. जीवनाच्या अशा एका टप्प्यावर वर्षानुवर्षे ज्या जागेमधे संसार थाटला, बहरला त्या जागेशी पटकन नाते तोडून तात्पुरत्या संक्रमण व्यवस्थेसाठी का होईना अन्य ठिकाणी या टप्प्यावर रहावयास जाणे त्यांना मानवणारे नाही व पचनीही

पडणार नाही. पुनर्विकासामुळे होणारी वाहनांची गर्दी, पायाभूत सुविधांवरचा ताण या मुळे जीवन अधिकच अडचणीचे होईल कां, ही चिंताही अनेकांना भेडसावते आहे. शिवाजी पार्क परिसराचा मराठी ठसाही पुसला जाईल अशी शंकेची पाल मराठी संस्कृतीचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या तरुण मनांमधे चुकचुकते आहे. असे असताना 'मराठी मराठी' हाच गजर लावून पुनर्विकासामधे हेरिटेज यादीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचा बागुलबुवा उभा करुन तेथील मराठी मध्यमवर्गियांना या संघर्षामधे ओढून कुणाचे हित जपायचे आहे ? मराठी माणसांचे की पुनर्विकासावर डोळा ठेवून, शिवाजी पार्क परिसरातल्या जागा अन्य भाषिंकांना विकून मलिदा कमावण्याची स्वप्ने पहाणाऱ्या बिल्डरांचे ?.

शिवाजी पार्क, प्रभादेवी, दादर, माहीम परिसरामधील परिसराच्या पुनर्विकासास आशीर्वाद कुणाचा ? कुणाचे हितसंबंध त्यांत गुंतलेले आहेत ? पुनर्विकासासाठी दडपण आणू पहाणाऱ्या एका तत्कालीन लोकप्रतिनिधीला श्री दत्तात्रेयाने शाप का दिला ? याचे उत्तर याच परिसरातील प्रा. वागळे सांगू शकतील. पुनर्विकासामधे रस घेणाऱ्या एका कर्तबगार नेत्याच्या सत्ता-मुकुटामधला 'कोहीनूर' हरवण्यास हेच कारण ठरले. हा अलीकडचा इतिहास नाकारता येणार नाही म्हणून पुनर्विकास, पुनर्विकास म्हणून आक्रोश करुन ऐतिहासिक स्थळ व परिसराच्या यादीमधे शिवाजी पार्क परिसर समाविष्ट करण्यास विरोध करण्याच्या राणा भीमदेवी गर्जना करणाऱ्यांनी विरोधाऐवजी परिणामकारक उपाय शोधून काढणे योग्य ठरेल जेणेकरुन ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसाही जपला जाईल व नागरिकांचे हितही जोपासले जाईल. दिशाभूल करुन दडपणे आणून विरोध संघटित करता येतो परंतु विरोधाचा ज्वर ओसरल्यानंतर वास्तविकतेचे भान येते. शिवाजी पार्क परिसरामधे सब-वे बांधण्यास विरोध करणाऱ्यांपैकी अनेकांना, दिवसेंदिवस वाढत्या वाहनांच्या गर्दीमुळे शाळांमधे जाणाऱ्या मुलांसाठी, महिलांसाठी व शिवाजी पार्क मैदानामधे विरंगुळा म्हणून जाणाऱ्या ज्येष्ठांसाठी सब-वे ची आवश्यकता जाणवू लागली आहे. भविष्यामधे ही आवश्यकता 'सब-वे हवा' म्हणून आंदोलन उभे करण्यासही कदाचित भाग पाडू शकेल.

शिवाजी पार्क असो वा मरिन ड्राईव्ह, वास्तुरचनेच्या आर्ट-डेको या विशिष्ट रचनेनुसार उभारलेल्या इमारती हे हया परिसराचे वैशिष्टय आहे. मेट्रो थिएटर हे आर्ट-डेको पध्दतीच्या वास्तु-रचनेचे उत्तम उदाहरण ! ही वास्तु–रचना या परिसराच्या सौंदर्यामधे भर टाकीत आहे. १९२५ च्या सुमारास या इमारती बांधण्यासाठी इमारतींभोवतीच्या मोकळया जागा, इमारतींची उंची आदिंबाबत विशिष्ट निर्बंध घालणाऱ्या अटींवर उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या भूखंडांवर हया इमारती उभ्या आहेत, त्यामुळे हया इमारतींच्या मालकांनी आज पुनर्विकास करता येणार नाही या सबबीखाली ओरड करणे सर्वथैव अयोग्य आहे. एक बाब मात्र दुर्लक्षित करता येणार नाही ती म्हणजे भाडे नियंत्रण कायद्यामुळे भाडे गोठविण्यांत आल्याने या इमारतींच्या डागडुजीकडे फारसे लक्ष ना इमारत मालकांनी दिले व ना इमारत दुरुस्ती मंडळाने आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली. त्यामुळे हेरिटेज वारसा जपून या इमारती सुस्थितीत ठेवण्यासाठी उभारावयाच्या निधीची तरतूद कशी करता येईल किंवा ज्यांचे नुकसान होईल त्यांना हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टीडीआर) माध्यमातून भरपाई देता येईल का ? याचा विचार प्रामुख्याने व्हावयास हवा. तसेच या इमारतींमधे रहाणाऱ्या भाडेकरुंना 'टेनंटेबल रिपेअर्स (रहाण्यायोग्य दुरुस्ती)' साठी, विनाविलंब परवानग्या मिळाव्यात या करिता नियमावली तयार व्हावयास हवी. महापालिकेमधे सत्तेवर असलेल्या व आज 'या इमारतींमधे रहाणाऱ्या भाडेकरुंना खिळा ही ठोकता येणार नाही' अशी भीती दाखवणाऱ्यांनी हयासाठी पुढाकार घेणे जास्त योग्य ठरेल. 'लांडगा आला रे आला' ही बोंब ठोकण्यापेक्षा 'लांडगा' कोण व कोठून येतोय हे प्रथम जाणून घेणे याचसाठी आवश्यक आहे.

शिवाजी पार्क असो वा पारसी कॉलनी या परिसरांना एक आगळी वेगळी संस्कृती आहे. परिसराचे अनोखे सौंदर्य आहे हे जपलेच पाहिजे. केवळ पुनर्विकासावरच ज्यांचे स्थानिक राजकारण पोसले गेले त्या नेत्यांना कदाचित हे शक्य होणार नाही व 'भेंडीबाजार' मधे हेरिटेज दर्जा कां नाही हा प्रश्न विचारीत रहाण्यांने धार्मिक भावना भडकावून फक्त राजकारण साध्य होईल, परंतु या शहरातली

उरली सुरली संस्कृती विशेषतः मराठी संस्कृती लयास जाण्यास अप्रत्यक्षपणे हातभारही लावला जाईल. 'भेंडीबाजार' बरोबर शिवाजी पार्क परिसराची तुलना म्हणजे, वर्गात नेहमी अभ्यासात पुढे असणाऱ्या विद्यार्थ्यांनी, नापास झालेल्या विद्यार्थ्यांवर जास्त अभ्यासाची सक्ती कां करत नाही असा प्रश्न विचारण्यासारखे आहे. हेरिटेज यादीतून हा परिसर वगळल्यास पुनर्विकास होईल, टॉवर्स उभे रहातील परंतु मराठी संस्कृतीची गौरवचिन्हे असणारी 'ही थोर माणसे येथे रहात होती' असे अभिमानाने दाखवण्यासारख्या जागा शिल्लक रहाणार नाहीत, शालीन व सोज्वळ सौंदर्य लाभलेल्या यौवनेने अचानक तंग आखूड कपडयांमधे आपल्या वडिलधाऱ्यांसमोर उभे रहावे, तसेच या परिसराचे शालीनता लाभलेले सौंदर्य हळू हळू लोप पावेल व मराठी संस्कृतीच्या छाताडावर उभे राहील टोलेजंग इमारतींचे बहुरंगी बहुढंगी कॉंक्रिटचे जंगल ! म्हणूनच, शिवाजी पार्क परिसराचा हेरिटेज यादीमधे समावेश करण्यास आंधळा विरोध करु नये व मराठी मध्यमवर्गिय संस्कृतीच्या या माहेरघराचे रक्षण करावे, एव्हढे तरी या शहरासाठी करावे हे आवाहन ! इंग्लंडमधे ५ लाखांवर स्थळांना हेरिटेज दर्जा देऊन राष्ट्राचा ऐतिहासिक वारसा जपण्यांत आला व शांघायमधे, ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इमारतींवर बुलडोझर फिरवून, आधुनिक शहर म्हणून टेंभा मिरवण्याचा मार्ग मोकळा केला गेला. या दोहोंपैकी, जायचे कोणत्या मार्गाने याचा विचार पुढचे पाऊल टाकण्यापूर्वी व्हावा हे बरे !



**(अजित सावंत)**
**सरचिटणीस व प्रवक्ता, मुंबई कॉंग्रेस (निलंबित)**
**मो.: 98200 69046**
**E-mail: ajitsawant11@yahoo.com**